सत्यमेव जयते

ज्ञानसेवा तु साफल्यम्

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**

email @- **curriculumdept@maa.ac.in**

**७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- ४११०३०**

call@ **०२०-२४४७६९३८**




**दिनांक- २७/०७/२०२५**

**प्रसिद्धी निवेदन-**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार इ.३री ते १०वी (वयोगट ०८ ते १४ वर्षे) साठी शालेय शिक्षण अभ्यासक्रम (प्रस्तावित) मसुदा- २०२५ राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे मार्फत तयार करण्यात आला आहे. सदर मसुद्यावर जनतेच्या सूचना व अभिप्राय मागविण्यात येत आहेत.

सदर मसुदा परिषदेच्या https://www.maa.ac.in/ या संकेतस्थळावर **दिनांक.२८/०७/२०२५ पासून** सर्वांना पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात येत आहे. सदर शालेय शिक्षण अभ्यासक्रम (प्रस्तावित) मसुदा- २०२५बाबत आपले अभिप्राय **दिनांक.२७/०८/२०२५ पर्यंत** खालील लिंक मध्ये ऑनलाईन नोंदवावेत असे आवाहन सर्व शिक्षण तज्ज्ञ, शिक्षक, अभ्यासक, पालक, अधिकारी, संघटना व समस्त समाज घटकांना करण्यात येत आहे.

अभिप्राय नोंदविताना अभिप्राय व सूचना सप्रमाण व सकारण असाव्यात ज्यामध्ये विषय, इयत्ता, स्तर, संबंधित पृष्ठ क्रमांक, मूळ मसूद्यातील मजकूर, अपेक्षित बदल/ दुरुस्ती, बदलाचे कारण, सुधारित मजकूर कसा असावा, यांचा समावेश असावा तसेच त्यामध्ये आपले नाव, दूरध्वनी, इ-मेल, पत्ता इत्यादी तपशील देण्यात यावा अशी विनंती.

टीप: अभिप्राय पोस्टाने पाठवायचे असल्यास त्यावर शालेय शिक्षण अभ्यासक्रम (प्रस्तावित) मसुदा- २०२५ बाबत अभिप्राय (अभ्यासक्रम विकसन विभागासाठी) असे ठळक अक्षरात लिहून, वरील पत्त्यावर पाठवावेत.

| | **शालेय शिक्षण अभ्यासक्रम मसुदा- २०२५** | **अभिप्राय नोंदविण्यासाठी LINK** |
|---|---|---|
| **QR Code** | | |
| **LINK** | https://www.maa.ac.in/ | https://forms.gle/2rgGA37iYKfJUYKS6 |
| **अभिप्राय नोंदविण्याचा कालावधी दि. २८/०७/२०२५ स.१०:००वा. ते २७/०८/२०२५ सायं.०५:००वा. पर्यंत.** | | |

**टीप-** शासन निर्णय दि.३०/०६/२०२५ अन्वये डॉ नरेंद्र जाधव यांचे अध्यक्षतेखाली त्रिभाषा धोरण अंमलबजावणीबाबत समिती नेमलेली आहे. सदर समितीच्या शिफारशी व त्यावरील होणाऱ्या शासनाचे निर्णयास अनुसरुन तिसऱ्या भाषेबाबत निर्णय लागू करण्यात येईल तोपर्यंत विद्यमान पद्धती चालू राहील.

Digitally signed by
RAHUL ASHOK REKHAWAR
Date: 27-07-2025
21:29:33

**(राहूल रेखावार,**भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.